INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue – 142

## Recent Trends in Language, Literature, Social Science & Commerce

**Guest Editor:**
Dr. Subhash Nikam,
Principal,
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon,
Dist. Nashik [M.S.] India

**Executive Editor of the issue:**
Dr. Arun Patil
Dr. Kalyan Kokane

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.261** **ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**February -2019 Special Issue – 142**

## Recent Trends in Language, Literature, Social Science & Commerce

**Guest Editor**
**Dr. Subhash Nikam,**
**Principal,**
**Mahatma Gandhi Vidyamandir's**
**Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College,**
**Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editor of the Issue**
**Dr. Arun Patil**
**Dr. Kalyan Kokane**

**Chief Editor**
**Dr. Dhanraj Dhangar (Yeola)**

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**
For Details Visit To : **www.researchjourney.net**

© **All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 800/-**

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# साहित्यातील एक नवा रुपबंध : अलक

**डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर**
महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक
मो. ९९२२७१३८२५

कथा सांगणे आणि कथा ऐकणे ही माणसाची फार पुरातन काळापासूनची आवडती बाब आहे. आजीने नातवाला गोष्ट सांगणे, कथेकऱ्याने हरिकथा निरुपण करणे, व्रत वैकल्यांच्या निमित्ताने स्त्रियांनी एकमेकांना कहाणी सांगणे, पुराणिकांनी पुराणकथा, कीर्तन, आख्यान सांगणे. तसेच ललित, भारुड, पोवाडा अशा अनेक माध्यमांतून कथा कथन आणि श्रवण करण्याची लोकपरंपरा महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून चालत आलेली आहे. या प्रकारे कथा हा वाङमय प्रकार परंपरेने चालत आलेला आहे. महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरु झाल्यानंतर मुद्रण कलेच्या आश्रयाने जे गद्य वाङ्मय पुढे आले त्यात कथेचे प्रमाण विपुल होते. स्फुट गोष्ट, संपूर्ण गोष्ट अशी तिची प्रारंभीची रुपे होती. वाचकांचे मनोरंजन करणे आणि त्याबरोबरच त्याला जीवनबोधाच्या चार गोष्टी पटवून देणे हे प्रारंभीच्या काळी कथेचे प्रयोजन होते. काळाच्या ओघात जसजसा समाज बदलत गेला तसतसे कथेचे स्वरुप बदलत गेले. त्यातून लोककथा, कहाणी, गोष्ट, स्फुट गोष्ट, लघुकथा, नवकथा, दीर्घकथा, रुपककथा, ग्रामीणकथा, दलित कथा, विज्ञान कथा यांचा जन्म होत गेला.

महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडात अध्यात्मप्रवण साहित्याची निर्मिती प्रामुख्याने झालेली आहे. या कालखंडात गद्याच्या तुलनेत पद्यातून मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती झाली. या काळातील कथा परमेश्वरी आवताराचे चित्रण करण्यात रमलेली होती. मात्र इंग्रजांच्या आगमनानंतर इंग्रजांचे शैक्षणिक धोरण व इंग्रजी साहित्याचा परिचय झाल्यामुळे भाषांतरीत साहित्याची निर्मिती होऊ लागली. त्याची सुरुवात कथा वाङमयापासून झालेली दिसते. हे प्रारंभीचे आधुनिक कथा वाङ्मय बहुतांशी भाषांतरीत, अनुकरणात्मक व अद्भुतरम्य होते. उदा. इसापनितीचे 'बालबोध मुक्तावली' या नावाने भाषांतर, तसेच वेताळ पंचविशी, हतिमताई चरित्र, पर्शियन नाईट्स इत्यादी. इ.स. १८८९ नंतर हरिभाऊ आपटे यांनी करमणूक नावाचे नियतकालिक काढून त्यातून स्वत: कथालेखन केले. मध्यमवर्गीय जीवनातील साधे भावोत्कट प्रसंग घेवून ते मोठ्या कलात्मकतेने त्यांनी कथांमधून रंगविले. त्यांची भाषा सुगम, सरळ व ओघवती असल्यामुळे या काळात मराठी कथेचे वाचक वाढले. त्यांची कथा काहीशी पाल्हाळीक होती. पृष्ठ संख्येचा विचार केला तर ४०-५० पृष्ठांपर्यंत तिचा विस्तार होता. ती वाचकांच्या पसंतीला उतरली होती.

पुढे मात्र औद्योगिक विकास झाल्यानंतर औद्योगिक संस्कृतीतील गतिमान जीवन व्यवहारामुळे कथेचा आकार हळूहळू मर्यादित होत गेला आणि तिला लघुकथेचे रुप प्राप्त झाले. एका बैठकीत वाचन ही लघुकथेच्या विस्ताराची मर्यादा ठरली. त्यामुळे तिचा विस्तार चिमुकला झाला. तिचा हा आकार तिच्या लोकप्रियतेचे कारण ठरला. 'गाठ-निरगाठ-उकल' असे तिचे तंत्र बनविले गेले. कथा रेखीव, तंत्रशुद्ध व आकर्षक बनली. तिच्यात उत्कंठावर्धक घटनांचे चित्रण, आरंभ-अखेरीतील आकर्षकत्व, कालसंबद्ध घटनांचे चित्रण, अनुभवाच्या कथनावर (निवेदनावर) विशेषभर, एकच एक भावनात्मक परिणाम साधणे इ. वैशिष्ट्ये प्रामुख्याने तिच्यात दिसू लागली. आशयविश्व, कथानक, पात्र (व्यक्तीरेखा), निवेदन, भाषाशैली, वातावरणनिर्मिती या कथेच्या घटकांचाही योग्य प्रमाणात विचार तिच्यात होवू लागला.

हरिभाऊ आपटेंनी सुरु केलेला आधुनिक मराठी कथेचा प्रवाह वि. सी. गुर्जर आणि पुढे दिवाकर कृष्ण, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, य. गो. जोशी इत्यादींनी समृद्ध आणि लोकप्रिय केला. तत्कालीन समाजाची आवड–निवड लक्षात घेऊन कलावाद–जीवनवाद ही तत्त्वे स्वीकारुन तसेच कौटुंबिक जीवनाचे चित्रण आपल्यात सामावून मराठी कथेने मार्गक्रमण केले. त्यामुळे तिचा वाचकवर्ग उत्तरोत्तर वाढत गेला. इ.स. १९४० नंतर दुसऱ्या महायुद्धाच्या छायेत गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर इत्यादींनी आशयदृष्ट्या मराठी कथेचा कायापालट घडविला आणि नवकथा म्हणून ती अधिकाधिक प्रयोगशील झाली. माणसाचे एकलेपण, मूल्यहीनता, कुटुंबसंस्कृतीची वाताहत, जीवनातील किडलेल्या प्रवृत्तींचे शोकगर्भ चित्रण नवकथेत अवतीर्ण झाले. व्यक्तीच्या अंतर्मनातील कोलाहलाकडे तिचे लक्ष प्रामुख्याने वेधले गेले.

स्वातंत्र्योत्तर काळात, शिक्षणाचा प्रसार खेड्या–पाड्यात, वाड्या–वस्त्यांपर्यंत झाल्यानंतर ग्रामीण भागातील तसेच दलित समाजातील शिकून पुढे आलेली लेखक मंडळी आतापर्यंत उपेक्षित असलेल्या ग्रामीण–दलित जीवनाचे चित्रण साहित्यातून करु लागली. आणि मराठी कथेची मूळ मध्यवर्ती दालनाबरोबरच ग्रामीण कथा, दलित कथा अशी नवीन दालने उघडली गेली. पुरुष लेखकांबरोबरच स्त्रियाही धीटपणे कथा–लेखन करुन आपले अनुभवविश्व स्त्रीवादी जाणिवेतून कथांमधून मांडू लागल्या तसेच विज्ञानाचा परिचय सर्वसामान्यांना करुन देण्यासाठी विज्ञानकथांची निर्मितीही होवू लागली.

विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत अशा प्रकारे मराठी कथा, कथाविषय अनुभवविश्व आणि अभिव्यक्तीची विविधता या सर्वच दृष्टींनी समृद्ध झाली. ती कसदारपणे साहित्यरुप घेऊन अवतरली. कथासंग्रहाबरोबरच इ.स. १९०९ पासून दिवाळी अंकांमधून आजतागायत कथाविश्व मोठ्या प्रमाणात आकाराला आलेले दिसते. मासिकांनी आणि दिवाळी अंकांनी मुबलक कथा छापल्या त्यांना बाजारमूल्य प्राप्त झाले, 'मासिकांनी आणि दिवाळी अंकांनी कथावाङ्मय लोकप्रिय केले. लोकप्रियतेचा हा अतिरेक या वाङ्मय प्रकाराचा दर्जा घसरविण्यास कारणीभूत ठरला' मात्र स्वातंत्र्योत्तर काळातील कथा बहुपदरी आहे.

इ.स. १९९० नंतर ग्लोबलायझेशनची प्रक्रिया अधिक गतिमान झाली. तंत्रज्ञानातही अनेक नवीन शोध लागल्यामुळे झपाट्याने क्रांती घडून आली. भारताने स्वीकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणामुळे तंत्रज्ञानातील प्रगती सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचली. त्यातच इंटरनेटमुळे माहितीचा खजिना सर्वसामान्य माणसाला उपलब्ध झाला. त्यामुळे जनजीवन ढवळून निघाले. मानवी जगण्याच्या कल्पना बदलल्या. अतिमहत्वाकांक्षेमुळे मानवाचा हव्यास वाढला. मानवी जीवन अधिकाधिक व्यस्त होत गेले. एकविसाव्या शतकात माहिती–तंत्रज्ञानाचा विस्फोट झाला. शेकडो वाहिन्या दाखविणारे दूरदर्शन संच घराघरात पोहोचले, सर्वसामान्यांच्या आवाक्यातील किंमतीत आणि सहजपणे उपलब्ध होईल असे टच स्क्रीनचे मोबाईल हॅन्डसेट सर्वसामान्य माणसाच्या विशेषत: तरुणांच्या हातात पोहचल्यामुळे पुस्तक वाचायला वेळच नाही म्हणणाऱ्यांच्या दुनियेत साहित्याच्या वाचकांची संख्या घटलेली दिसते आणि म्हणूनच 'वाचन प्रेरणा दिन'सारखे दिवस साजरे करण्याची वेळ समाजावर येऊन ठेपली. महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावर ज्ञान–विज्ञान वाचन चळवळ उभी करण्याचे प्रयत्न सुरु झाले.

ज्याप्रमाणे धावपळीच्या युगात कसोटी क्रिकेट सामन्यांवरुन एक दिवसीय सामने आणि पुढे २०–२० क्रिकेट सामने असे कमी–कमी वेळाचे सामने क्रिकेट जगताने स्वीकारले तसेच बदल इंग्रजी, हिंदीतील कथेबरोबरच मराठी कथेने माहिती तंत्रज्ञानाच्या युगात स्वीकारलेले दिसतात. मराठी लघुकथेच्या मध्यवर्ती प्रवाहाबरोबरच व्हाटस्‌ॲप, फेसबुक यासारख्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून तसेच ब्लॉगरच्या माध्यमातून नव्यानेच लिहित्या झालेल्या काही लेखक–लेखिकांनी अलक (अति लघु कथा) या नव्या रुपबंधात एक ते

साधारणत: पंधरा सोळा वाक्यांची कथा लिहायला सुरुवात केलेली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून त्याचे कमी खर्चात सहजगत्या प्रकाशन केले जाते आणि वाचकांनाही त्या 'अलक' अगदी सहजगत्या वाचनासाठी उपलब्ध होतात. अलक लिहीणाऱ्या कविता दातार एके ठिकाणी म्हणतात, ''मी कविता दातार २२ वर्षांपासून जळगाव येथे संगणक प्रशिक्षण संस्था चालवत आहे. वर्ष २०१५ मध्ये ethical hacking and cyber security हा विषय शिकवताना जाणवले की, आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक असलेले इंटरनेट आणि माहिती तंत्रज्ञान, अपुऱ्या माहितीमुळे धोकादायक ठरु शकते. जाणता–अजाणता सायबर गुन्हे घडू शकतात किंवा निष्पाप व्यक्ती अशा गुन्ह्यांची शिकार होऊ शकतात. मग या क्षेत्रात समाज जागृती करण्याचे ठरवले त्याचाच एक भाग म्हणून presentation video V`ma H$éZ You tube वर अपलोड केला आणि सायबर क्राइम कथांचा इश्रेस तयार केला. (http:\\cyberstoriesof kavitadatar.blogspot.com) माझ्या काही कथा Whatsapp आणि ऋलशलेझ वरही viral झाल्या आहेत.... इतर विषयांवरही लिहायला सुरुवात केली. कल्पनेपेक्षा जास्त प्रतिसाद मला आपणाकडून मिळाला.''

**कविता दातार यांच्या अलक : अति लघु कथा : विरोधाभास**

१) आपल्या लाडक्या एकुलत्या मुलाला सारखा मोबाईल घेऊन बसण्याबद्दल रागावून तिने खोलीचे दार बंद केले आणि व्हाटस्‌ॲप उघडून मेसेजेस चेक करु लागली.

२) पैशांचा अपहार केल्याप्रकरणी निलंबीत झालेल्या त्या बँक अधिकाऱ्याने आज त्याच्या गाडीचा आरसा चोरणाऱ्या एका लहानग्या, कचरा वेचणाऱ्या मुलाला बेदम मारहाण केली

३) कितीतरी वाट चुकलेल्या मुला मुलींना आपल्या समुपदेशनाने मार्गावरआणणाऱ्या तिला स्वत:च्या उर्मट, हट्टी हाताबाहेर गेलेल्या मुलाला कसे समजावे हे कळत नव्हते.

४) तो एक प्रसिद्ध इथिकल हॅकर पण आज त्याचेच बँक अकाऊंट हॅक करुन परस्पर पाच लाख रुपये कोणी तरी काढून घेतले होते.

५) रेल्वे स्टेशनवरची अस्वच्छता बघून तिने नाक मुरडले आणि मुलीने खाऊन संपविलेल्या बिस्किटचा पुडा प्लॅटफार्मवर भिरकावला.

**२) मकरंद वाले यांच्या अलक :**

मकरंद वाले यांनी त्यांच्या अलक प्रसिद्ध करताना प्रारंभीच म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वीच एक नवीन लेखन प्रकाराशी माझी ओळख झाली. त्याला अलक म्हणजेच अति लघु कथा असं म्हणतात. आणि पुढे त्यांनी त्यांना सुचलेल्या खालील पहिल्या वहिल्या अलक दिलेल्या आहेत. (दि. १८ एप्रिल २०१८)

१) काही लोक एकटेपणाबद्दल फार विचार करतात. एकटेपण फार भेसूर...खायला उठणारं असं त्यांना वाटतं... असच एकदा एकान मला विचारलं, तुला कधी एकटं नाही वाटत? एकटेपण खायला नाही उठत? मला क्षणभर कळेनाच त्याला काय सांगावं? मी उत्तरलो, ज्याच्याकडे सुंदर विचारांचा ठेवा आहे, तो कधी एकटा कसा पडेल? एकटेपण त्याला कधीच खायला उठणार नाही उलट एकटेपण त्याला अजून शहाणं, विचारी बनवेल.

२) नामास एकदा फारच गर्व झाला. ते म्हटलं मी श्रेष्ठ. माझं उच्चारण भवपार तारुन नेतं. संतमंडळी माझ्याठायी लीन होतात. शब्द आणि अर्थ दोघेही शांत बसून होते. ते म्हणाले, आमच्यामुळेच तर तू जन्मास येतोस. रामराम की आराम की हाराम की मरामरा असं नुसतं योजून भागत नाही रे. शब्दाला अर्थ प्राप्त झाला की आपसूक त्याचं नाम होतं...

३) निर्माल्य म्हणून फेकून दिलेलं ते वाळकं झेंडूचं फुल जेव्हा हलक्या पाऊस सरींनी अलगद अंकुरल तेव्हा पुनर्जन्मावर माझा विश्वास बसला.

४) आजी नेहमी सांगायची, अंथरुण पाहून पाय पसरा. तीचं बोलणं मनावर घेतलंच नाही कधी. स्वत:च्याच मस्तीत. आता मोठे झालो...आज मोठे तालेवार समजतो स्वत:ला. पाण्यासारखा पैसा खर्च करतो हव्या त्या गोष्टीवर. पण आजची पाणी परिस्थिती पाहता पैशासारखं पाणी खर्च करायला जेव्हा शिलकेत असेल तेव्हा तुम्ही तालेवार... आजी आज असती तर नक्की म्हणाली असती...

५) सतत तक्रार करत राहणे हा जणू आपला स्थायीभावच झालाय. बुटांचे दोन जोड असूनही मुलगा चांगले ब्रान्डेड बुट नाहीत म्हणून हिरमुसला होता. भुणभुण सुरु होती...पण अचानक त्याने तक्रारीचा सूर सोडून दिला. काय झालं म्हणून मी डोकावून पाहीलं. तो खिडकीतून एका माणसाकडे पाहत होत्या ज्याला पायच नव्हता.

६) रस्त्याने मला एकदा विचारलं, काय रे जीवनाचा मार्ग सापडला का?

७) म्हातारीने पिंजऱ्यात डांबून ठेवलेला पोपट एकदा पुटपुटला. ही जरा आणि मला पिंजरा

**३) अमोल गवारी यांच्या अलक (दि. १२ एप्रिल २०१८) :-**

आयुष्य संथ झालं म्हणून तक्रार करत होतो. तेव्हा मैलाचा दगड भेटला अन् म्हणाला :

मी स्थीर आहे म्हणूनच लोकांना त्यांची गती मोजता येत्ये रे!

माझ्या एका सत्कार समारंभात मला आकाश भेटलं कानात कुजबुजत म्हणालं, एवढ्यात शेफरलास? जी मोजता येत नाही ती खरी उंची.

३) कुठलीही गोष्ट हसण्यावारी नेतो म्हणून मी मित्रावर रागावलो. तो मला समुद्रकिनारी घेऊन गेला आणि त्याने मला विचारलं, या समुद्राची खोली किती असेल सांगू शकशील? तेव्हापासून मी मत बनवत नाही कुणाबद्दल.

४) मला वाटलं कठीण हृदयाच्या माणसांना सौंदर्य कसं समजणार? एक हिरा लुकलुकला. म्हणाला, वेडा रे वेडा.

५) लग्न झाल्यावर तिचे शेवटचे दिवस आनंदात गेलेले मी स्वत: पाहिलेत. मग माझं प्रेम आंधळं होतं असं का म्हणतात लोक?

६) कमी मार्क मिळाले म्हणून एका कोकराला कोणीतरी बदलडत होतं. त्या कोकराच्या डोळ्यातले भाव वाचले मी, ते म्हणत होतं, करुन बघायचं की बघून करायचं, ठरवू देत की मला मी कसं जगायचं!

७) माणसाची किंमत पैशात करताच येत नाही असं तोंडाने म्हणत शहिद जवानांच्या कुटुंबियांना पन्नास पन्नास हजार दिले मंत्री महोदयांनी.

८) सहजीवन रथ असून नवराबायको ही त्याची चाकं असतात. असं घटस्फोट घेणाऱ्या जोडप्याला समुपदेशक सांगत होते. पण रथाला जोडलेल्या दोन्ही चाकांना आपापली गती सोडून एकाच गतीत पळत राहण्याची सक्ती होते हे भौतिकशास्त्र ते विसरुन गेले होते.

९) एका वाढदिवसाला मला आयुष्यानं विचारलं, जगलास किती दिवस?

१०) प्रेताने सरणावरच्या लाकडांना विचारलं, माझ्याबरोबर तुम्ही का जळताय? लाकडं म्हणाली, मैत्री म्हणजे काय ते कळत नाही का अजूनही तुला?

११) पांगळ्या मुलाला भर उन्हात खांद्यावरुन उतरवून रस्त्याच्या कडेला एका फाटक्या पातेऱ्यावर बसविल्यावर त्याचा घाम आपल्या नवखंडी पदराने पुसून ती माऊली एकुलती एक कोरडी शिळी पोळी त्याला भरवताना म्हणाली बाळा दमला असशील ना? खा पोटभर!

१२) माणसांनी देवला विचारलं संकट का पाठवतोस?

देव म्हणाला माणसाला होणाऱ्या माझ्या विस्मरणावरचं हमखास औषध आहे ते.

१३) विश्वास या शब्दात श्वास का आहे?

दोन्हीही एकदा जरी तुटले तरी संपतं सगळं!

१४) दरवेश्याचं माकडाशी वागणं बघून मला माकडाची दया आली

माझ्या मनाचा मला लगेच प्रश्न, माकडाची येते पण माझी नाही येत दया तुला?

त्यावर माझा मनाला प्रतिप्रश्न, माकडानं दरवेश्याला खेळवताना पाहिलं आहेस कधी?

१५) नाती का जपायची?

रेशमाच्या धाग्याचा गुंता सोडवून पहा एकदा...

१६) आठवणींची एक गंमत आहे.

त्याच्यात गुंतून राहिलात तर नवीन निर्माण नाही होत!!

१७) माणूस देवाला म्हणाला, माझा तुझ्यावर विश्वासच नाही.

देव म्हणाला वा!! श्रद्धेच्या खूप जवळ पोहचला आहेस तू. प्रयत्न सुरु ठेव.

१८) गवई एकदा तानपुऱ्याला म्हणाला, तू नसलास तर कसं होईल माझं?

तानपुरा म्हणाला, अरे वेड्या! माझी गरज लागू नये हेच तर ध्येय आहे.

१९) विठुमाऊली एकदा एकादशीला दमून खाली बसली. मी विचारलं, काय झालं?

विठुराया म्हणाले, पुंडलिकाचा गजर करतात लेकाचे पण मायपित्यांना एकटं सोडून अजून माझ्याचकडे येऊन झोंबतात वेडे कुठले.

२०) एकटं वाटलं म्हणून समुद्रावर गेलो एकदा. त्याला विचारलं कसा एकटा राहतोस वर्षानुवर्ष?

तो म्हणाला एकटा कुठला, मीच माझ्यात रमावं म्हणून ईश्वराने लाटा दिल्या आहेत ना मला.

मी विचारलं, 'माझं काय?' तो हसून म्हणाला, 'नामस्मरण आणि माझ्या लाटांमध्ये काहीच साम्य दिसत नाही का तुला?'

मराठी भाषेतील अलक प्रमाणेच हिंदी भाषेतील बऱ्याच अलक गुगलवर अलक सर्च केल्यावर पहायला मिळतात. त्यात प्रामुख्याने 'सुनीये मेरी भी' या शीर्षकाखाली प्रवीण (दि. १४ मार्च २०१५) यांच्या तसेच दिग्वीजय अग्रवाल (२० मे २०१८), अर्चना चावजी (२६ मार्च २०१५), इत्यादींच्या अलक वाचायला मिळतात. अशा प्रकारे अलक हा लेखन प्रकार अलिकडच्या काळात इंटरनेट वरील सोशल मिडीयाच्या (समाज माध्यमांच्या) द्वारे सर्वांपर्यंत पोहचत आहे.

अलक या रुपबंधाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसून येतात.

१) पद्यातील हायकू या काव्य प्रकाराप्रमाणे हा अल्पाक्षरी गद्य लेखन प्रकार आहे.

२) अलक मधील घटना, प्रसंग लघुकथेप्रमाणे कार्यकारणभावाने जोडलेले असतात.

३) अलक मध्ये प्रामुख्याने सूचकता हे वैशिष्ट्य दिसते.

४) अलक ची भाषा आशयगर्भ असते.

५) अलक लेखनासाठी लेखकाजवळ समाजाचे आवश्यक निरीक्षण-संशोधन असावे लागते.

६) अलकच्या माध्यमातून गोष्ट सांगण्याच्या नव्या नव्या पद्धती वापरलेल्या दिसतात.

७) अलक लेखनामागे लेखकाची कल्पकता, बुद्धिमत्ता, सृजनशीलता, व्यासंग दिसून येतो.

८) कमीत कमी वेळेत बसल्या जागी विश्व कवेत घेणारे लेखक अलक मधून दिसतात.

९) अलक लेखकांची भाषेवरची कमालीची हुकुमत दिसून येते.

१०) अलक वाचल्यानंतर वाचकाला लगेच आपली प्रतिक्रिया तेथेच नोंदविता येत असल्यामुळे लेखकाला लगेचच वाचकांच्या प्रतिक्रिया मिळतात.

सामाजिक बदलांप्रमाणे कथेची रुपे बदलत गेली. मानवी जगण्याच्या कल्पना जशाजशा बदलत गेल्या तशी कथा बदलत गेली. तिचे आकार कमी जास्त होत गेले. जगण्याचा परीघ जसाजसा रुंदावत गेला तसतशी मराठी कथेची कक्षाही रुंदावत गेली. एकविसाव्या शतकात मात्र माहिती-तंत्रज्ञानाच्या विस्फोटाच्या युगात विविध क्षेत्रात कार्यरत असणारी माणसे आपल्याला आलेले अनुभव कलात्मक रुपात कमीत कमी वेळेत कल्पकतेने मांडून कथन परंपरेशी 'अलक' या नव्या रुपबंधाच्या माध्यमातून आपली नाळ जोडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. तसेच वाचकही आपल्या धावपळीच्या जीवनात मिळणाऱ्या फुरसतीच्या वेळेत ते वाचण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

**संदर्भ :-**

१. 'वाङमयप्रकार : आकलन आणि रसास्वाद-कथा', य.च.म.मुक्त विद्यापीठ,

२. आ. १ ली, नाशिक, १९९१

३. सतीश बडवे, 'साहित्याची सामाजिकता', आ. १ ली, श्रीरामपूर, २०१३

**4.** .google.com